# DR. AMBEDKAR COLLEGE

**DEEKSHABHOOMI, NAGPUR-10**

**NAME OF THE PROGRAMME:**

**SAVITRIBAI PHULE BIRTH ANNIVERSARY CELEBRATION**

**ORGANISED BY: WOMEN'S DEVELOPMENT CELL**

**DATE OF THE PROGRAMME: 03 JANUARY 2022**

## डॉ आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर -१०

### सूचना

महाविद्यालयातील वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते कि सोमवार, दिनांक ०३ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११.00 वाजता महाविद्यालयाच्या ॲड दादासाहेब कुंभारे सभागृहात 'सावित्रीबाई फुले आणि भीमा कोरेगाव शौर्य दिन' निमित्य अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. कमलताई गवई (माजी लेडी गव्हर्नर), अमरावती भूषविणार आहेत. याप्रसंगी 'महानायिका सावित्रीआई ' या विषयावर आयु. सारिका उबाळे (अमरावती) तसेच 'भिमा कोरेगाव शौर्य दिन' या विषयावर आयु. प्रशिक आनंद (नागपूर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

करीता सर्वांनी कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

(डॉ. श्रीमती बी. ए. मेहेरे)
Officiating Principal
Dr. Ambedkar College,
Deekshabhoomi,
Nagpur.

# DR. AMBEDKAR COLLEGE

NAAC REACCREDITED WITH 'A' GRADE
COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE
DEEKSHABHOOMI, NAGPUR-440 010 (M.S.)
I PH.: 0712-2955785 I E-MAIL: dacn_ngp@rediffmail.com
I VISIT US AT: www.dacn.in


दिनांक : 3–1–2022.

–: प्रसिध्दिकरिता :–

## डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथे भीमा कोरेगाव शौर्य दिन व सावित्रीबाई फुले जयंती चा कार्यकम संपन्न

महिला विकास मंच, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर आणि नागपूरातील विविध आंबेडकरवादी महिला संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने भीमा कोरेगाव शौर्य दिन व सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने महिला दिनाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यकमाच्या अध्यक्षा, माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई होत्या. त्यांनी उपस्थितांना अमुल्य असे मार्गदर्शन केले. अनेक पुरस्कार प्राप्त प्रसिध्द कवियत्री सारिका उबाळे यांनी सावित्रीबाईच्या कार्याचा अभ्यासपूर्वक आढावा घेतला. आजच्या स्त्रीचे वास्तव त्यांनी आपल्या भाषणातून मांडले. सिमॉन दी. बोअर यांचा आवर्जून उल्लेख करून त्यांनी विविध अंगाने स्त्री असमानतेचा आढावा घेतला.

कार्यकमाचे दुसरे वक्ते मा. प्रशिक आनंद यांनी भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त आपले विचार मांडले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, बांध्द आणि वैदिक संघर्ष हा मरणान्तिक संघर्ष होता. तसेच 1 जानेवारी 1818 रोजी झालेल्या युध्दाचा आढावा घेउन युध्दाचे ऐतिहासिक विश्लेषण त्यांनी केले.

या कार्यकमात आंबेडकरवादी महिला फोरमच्या वतीने विविध क्षेत्रातील महिलांच्या कर्तृत्वाची जाण ठेवून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यात सामाजिक कार्यामध्ये अमुल्य योगदान असलेल्या जेबून्निसा शेख यांचा, लेखन क्षेत्रात आपला ठसा उमटविणा–या साहित्यिक सुजाता लोखंडे, नाटय क्षेत्रातील प्रसिध्द अभिनेत्री सांची जीवने, नाटय आणि कला क्षेत्रातील नामवंत असलेल्या व जयंती चित्रपटात भूमिका साकारणा–या विभा गजभिये, किडा क्षेत्रातील आशा मेश्रामं, सामाजिक क्षेत्रात कार्यरत शारदा झामरे या कर्तृत्ववान महिलांना 'आंबेडकरवादी महिला फोरम पुरस्कार – 2022' पुरस्काराने सम्मानित करण्यात आले.

कार्यकमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सरोज आगलावे यांनी तर सुत्रसंचालन प्रा.डॉ. सरोज डांगे यांनी केले. आभार प्रदर्शन वंदना जीवने यांनी केले. स्वागतपर भाषण, कार्यकमाचे आयोजन आणि इतर सर्व जबाबदारी डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या, डॉ. भूवनेश्वरी मेहरे यांनी केले. तसेच या कार्यकमात नागपूरातील आंबेडकरी महिला संघटनेतील श्रीमती तक्षशिला वाघधरे, छाया खोब्रागडे, कल्पना मेश्राम यांसह असंख्य महिला कार्यकर्त्यांसह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.


आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर
सावित्रीबाई फुले जयंती
महिला दिन
आणि
कोरेगांव शौर्य दिन-१ जानेवारी
अभिवादन समारंभ
आयोजक
मंच, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर
विविध आंबेडकरवादी महिला संघटना


सावित्रीबाई फुले जयंती
महिला दिन
शौर्य दिन-१ जानेवारी
अभिवादन समारंभ
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर
आंबेडकरवादी महिला संघटना


परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर
सावित्रीबाई फुले जयंती
३ जानेवारी-महिला दिन
आणि
कोरेगांव शौर्य दिन-१ जानेवारी
अभिवादन समारंभ


DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHABHOOMI
NAGPUR



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले
३ जानेवारी-महिला
आणि
भीमा कोरेगांव शौर्य दिन-१ ज
अभिवादन समारंभ




परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षा
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ज
३ जानेवारी-महिला दिन
आणि
भीमा कोरेगांव शौर्य दिन-१ जानेवा
अभिवादन समारंभ
आयोजक : महिला विकास मंच, डॉ. आंबेडकर महाविद्या
आणि नागपूरातील विविध आंबेडकरवादी महि


********************